सा्ताहिक

# निर्भीड वर्तमान

निडर लेखनी, निष्पक्ष बातमी.!

■ PRGI No. MAHMAR/2023/90686 | संपादक : सौ. अश्विनी श्रीकांत दारोळे | ■ Web : www.nirbhidvartmaan.com

■ वर्ष ३ ले ■ अंक ५ ■ शुक्रवार, दि. ८ जानेवारी ते १४ जानेवारी २०२६ ■ मुल्य : २ रु ■ पाने ४


## बनावट दिव्यांग प्रमाणपत्रांवर तुकाराम मुंढेंचा 'सर्जिकल स्ट्राईक'

■ **गैरप्रकार करणाऱ्यांवर होणार थेट फौजदारी कारवाई**

**मुंबई:** दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि खऱ्या लाभार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी दिव्यांग कल्याण विभागाने आता कडक पावले उचलली आहेत. बनावट कागदपत्रांच्या आधारे वैश्विक दिव्यांग ओळखपत्र (UDID) मिळवणाऱ्यांवर आणि त्यांना मदत करणाऱ्यांवर 'दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६' नुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी दिले आहेत.




> "बनावट प्रमाणपत्रांमुळे खऱ्या दिव्यांगांवर अन्याय होत आहे. हा प्रकार थांबवण्यासाठी सर्व यंत्रणांनी अधिक सतर्क राहून प्रत्येक अहवालाची पडताळणी करणे आवश्यक आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांची गय केली जाणार नाही.
>
> **- तुकाराम मुंढे, सचिव, दिव्यांग कल्याण विभाग.**

**काय आहे नेमकं प्रकरण?**

शासकीय नोकरीतील आरक्षण, विविध योजनांचे लाभ आणि सवलती मिळवण्यासाठी 'णऊखऊ' कार्ड हे महत्त्वाचे दस्तऐवज आहे. मात्र, अलीकडे काही व्यक्ती प्रत्यक्ष वैद्यकीय तपासणी न करता किंवा बनावट तपासणी अहवालांच्या (Medical Reports) आधारे हे कार्ड मिळवत असल्याचे समोर आले आहे. यामुळे पात्र आणि गरजू दिव्यांग व्यक्तींच्या संधी हिरावल्या जात असल्याने प्रशासनाने ही गंभीर दखल घेतली आहे.

**'अली यावर जंग' संस्थेच्या नावाचा गैरवापर**

सचिव मुंढे यांनी विशेषतः अली यावर जंग नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पीच अँड हिअरिंग डिसॅबिलिटीज (AYJNISHD) या संस्थेचा उल्लेख केला आहे. या संस्थेत प्रत्यक्ष तपासणी न करताच तयार केलेले बनावट अहवाल अनेक ठिकाणी सादर केले जात असल्याचे उघड झाले आहे.

**प्रशासनाचे नवीन कडक नियम:**

सक्तीची पडताळणी: सर्व संबंधित प्राधिकरणांनी श्रवण व भाषण दोष असलेल्या व्यक्तींचे तपासणी अहवाल पडताळणीसाठी संस्थेच्या अधिकृत ई-मेलवर (ayjnihh-mumnic.in) पाठवणे अनिवार्य करण्यात आले आहे.

अहवाल ग्राह्य धरण्यापूर्वी खातरजमा: जोपर्यंत संबंधित संस्थेकडून अहवालाची सत्यता सिद्ध होत नाही, तोपर्यंत लाभ दिले जाऊ नयेत.

कठोर कारवाईचा इशारा: चुकीची माहिती देऊन प्रमाणपत्र मिळवणे हा कायद्याने गुन्हा असून, यात दोषी आढळणाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल केले जातील.

**खऱ्या दिव्यांगांना आवाहन**

प्रशासनाने दिव्यांगांना आवाहन केले आहे की, त्यांनी कोणत्याही एजंटच्या आमिषाला बळी न पडता अधिकृत रुग्णालये आणि संस्थांमार्फतच आपली तपासणी करून घ्यावी. बनावट मार्गाचा अवलंब केल्यास केवळ लाभच रद्द होणार नाहीत, तर तुरुंगवासाची कारवाई देखील होऊ शकते.






## लुटीच्या पैशातून हुकूमशाहीचा घाट - अॅड. आंबेडकर

सभेला संबोधित करताना अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी सत्ताधारी आणि भ्रष्ट व्यवस्थेवर कडाडून हल्ला चढवला. ते म्हणाले की, संविधानाच्या विरोधात असणारी व्यवस्था म्हणजेच 'मनुवादी व्यवस्था' होय. आज देशात ४०० कोटींचे काम ८०० कोटींमध्ये दाखवून सरकारी तिजोरीची उघड लूट केली जात आहे. याच लुटलेल्या पैशांच्या जोरावर निवडणुका जिंकण्याचा आणि लोकशाही यंत्रणांवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

एकपक्षीय हुकूमशाही धोक्याची घंटा

बिहार निवडणुकीच्या अनुभवाचा दाखला देत आंबेडकर पुढे म्हणाले, जर हीच प्रथा सुरू राहिली, तर भविष्यात राजकीय पक्षांचे अस्तित्व नगण्य होईल. विरोधी पक्ष संपले की देशात 'एकपक्षीय हुकूमशाही' यायला वेळ लागणार नाही. तेव्हा सत्ताधारी हवे तसे वागतील आणि त्यांच्याविरोधात लढणे अशक्य होईल. त्यामुळे संघटन जिवंत ठेवणे, हेच संविधानाचे खरे संरक्षण आहे.

सत्ताधारी होण्यासाठी हीच खरी वेळ!

फुले-शाहू-आंबेडकरी विचारांच्या समुदायाला आवाहन करताना ते म्हणाले, आपल्याला मिळालेल्या मतांची भीती समोरच्याला वाटली पाहिजे. या विचारांचा माणूस केवळ राजकारणी नाही, तर आता 'सत्ताधारी' झाला पाहिजे. ही संघर्षाची वेळ आहे; तुम्ही स्वतःच्या स्वाभिमानासोबत आहात की पैशासोबत, हे आता ठरवा. जोपर्यंत संविधानिक व्यवस्था टिकून आहे, तोपर्यंतच वंचित वर्ग सुरक्षित आहे.

नागपुरात भाजप आणि काँग्रेस यांच्या पारंपरिक लढतीत वंचित बहुजन आघाडीने आपला स्वतंत्र अजेंडा मांडल्याने ही निवडणूक चुरशीची झाली आहे. इंदोरा मैदानावरील या विराट सभेने नागपूरच्या राजकीय मैदानात 'वंचित'ने आपली मोहर उमटवली असून, कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला आहे.

यावेळी या जाहीर सभेत वंचित बहुजन आघाडीचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते. या सभेत इंदिरा सभा घोषणांनी दुमदुमून गेला होता.


## अर्ज मागे घेण्यावरुन सोलापूरात मनसे पदाधिका-याची हत्या

■ **भाजपच्या दोन गटात राडा मोठा बंदोबस्त तैनात**

सोलापूर : महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सोलापुरात राजकीय वादातून भाजपमधील दोन गटात टोकाचा वाद झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. महापालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी चांगलाच राडा झाला. सोलापुरातील जोशी गल्ली परिसरातील भाजपचे माजी नगरसेवक शंकर शिंदे यांचे संपर्क कार्यालय भाजपच्याच दुस-या गटाने फोडले. आपल्या समर्थक उमेदवारास उमेदवारी न मिळाल्याच्या करणावरून दुस-या गटाने कार्यालय फोडल्याचा आरोप करण्यात आला. यावेळी, पोलिसांनी मोठा बंदोबस्त लावून हस्तक्षेप केला. मात्र, येथील राड्यातच एका तरुणाची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दरम्यान, या घटनेनंतर महापालिका परिसरातील घटनास्थळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात आहे.

सोलापूर शहरात राजकीय वादातून एकाची हत्या करण्यात आली असून बाळासाहेब सरवदे असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. मनसे विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी असलेल्या बाळासाहेब सरवदे यांची राजकीय वादातून हत्या झाल्याचा आरोप केला जात असून या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. सोलापूर महापालिका प्रभाग २ मध्ये अर्ज माघारी घेण्यावरून आज भाजपच्या दोन गटात वाद झाला.

## मुंढवा जमीन घोटाळा: चौकशीच्या नावाखाली 'वेळकाढूपणा'; खारगे समितीला पुन्हा मुदतवाढ



**पुणे:-** पुण्यातील बहुचर्चित मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणी राज्य सरकारने नेमलेल्या विकास खारगे समितीला पुन्हा एकदा एका महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी होणार की केवळ 'वेळकाढूपणा' करून मुख्य लाभार्थ्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला जाणार, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. ज्येष्ठ माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी या प्रकरणावर कडक शब्दांत टीका केली असून, हा चौकशीचा फार्स असल्याचे म्हटले आहे.

**चौकशी समिती की 'संरक्षण कवच'?**

पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीला शासकीय जमीन विक्री केल्याच्या प्रकरणात अनियमितता झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली 'उच्चाधिकार समिती' नेमण्यात आली होती. या समितीने दोन महिन्यांपूर्वीच आपला अहवाल सादर करणे अपेक्षित होते, मात्र आता पुन्हा मुदतवाढ मिळाल्याने संशयाचे वातावरण गडद झाले आहे.

**विजय कुंभार यांनी उपस्थित केलेले कळीचे मुद्दे:**

सरकारी अनास्था: हा घोटाळा आता केवळ चौकशीचा विषय राहिलेला नसून, तो सरकारी अनास्थेचा जिवंत नमुना ठरला आहे.

■ **हितसंबंधांचा संघर्ष: ज्या अधिकाऱ्यांची जबाबदारी**



**असे घोटाळे थांबवण्याची होती, तेच अधिकारी आज चौकशी समितीचे सदस्य आहेत. यामुळे दोषींनीच स्वतःची चौकशी करण्यासारखा हा प्रकार असल्याचे कुंभार यांनी सुचवले आहे.**

■ **मुख्य लाभार्थी चौकशीबाहेर: समितीने 'दोषी कोण' आणि 'जबाबदार कोण' हे शोधणे अपेक्षित होते, पण प्रत्यक्षात मुख्य लाभार्थी अजूनही कायद्याच्या कक्षेबाहेरच आहेत.**

■ **योजनाबद्ध पाठीशी घालण्याचा प्रयत्न: ही समिती न्यायासाठी नसून, हा एका योजनाबद्ध घोटाळ्याला संरक्षण देण्याचा प्रकार आहे, असा गंभीर आरोपही कुंभार यांनी केला आहे.**

**काय आहे मुंढवा जमीन प्रकरण?**

पुण्यातील मुंढवा येथील मौल्यवान शासकीय जमीन नियम धाब्यावर बसवून एका खाजगी कंपनीला (अमेडिया) हस्तांतरित करण्यात आल्याचा आरोप आहे. या व्यवहारामुळे सरकारचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे बोलले जाते. या प्रकरणात राजकीय लागेबांधे असल्याच्या संशयामुळे उच्चस्तरीय चौकशीची मागणी करण्यात आली होती.

**निष्कर्ष**

खारगे समितीला मिळालेली ही मुदतवाढ प्रशासकीय प्रक्रियेचा भाग आहे की राजकीय दबावापोटी घेतलेला निर्णय, यावर आता चर्चा रंगली आहे. सामान्य जनतेला आणि सामाजिक कार्यकर्त्यांना या चौकशीतून ठोस काही निष्पन्न होईल अशी अपेक्षा धूसर वाटत आहे.

## 'एबी' अर्ज गिळल्याप्रकरणी शिंदे गटाच्या उमेदवाराविरुद्ध गुन्हा

**पुणे** : शिवसेनेच्या (शिंदे) एका उमेदवाराने आपल्याच पक्षाच्या दुसऱ्या उमेदवाराचा 'एबी' अर्ज गिळल्याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांकडून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयात मंगळवारी ही घटना घडली.

याप्रकरणी उद्धव लहू कांबळे (वय ३४, रा. विवेकानंदनगर कॉलनी, धनकवडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत धनकवडी-सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयातील सहायक निवडणूक अधिकारी मनीषा भुतकर (वय ५८) यांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

# संपादकीय

## देवाभाऊंचे 'डॅमेज कंट्रोल'!

राज्यात महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू असून त्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विजय संकल्प सभांचा धडाका चालू आहे. बुधवारी मुख्यमंत्री लातुरात होते. दोन दिवसांपूर्वीच भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी भाजपच्या प्रचार सभेत लातूरचे सुपुत्र माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याबद्दल अनुद्गार काढले होते. त्यामुळे लातूरमधील राजकीय वातावरण तापले होते. रवींद्र चव्हाण यांच्या वक्तव्यानंतर काँग्रेस पक्षाने त्यांच्याविरोधात टीकेची झोड उठवली होती. सर्वपक्षीय राजकारण्यांशी सलोख्याने वागणा-या विलासराव देशमुखांबाबत रवींद्र चव्हाणांनी वापरलेल्या भाषेबाबत महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळात नापसंती व्यक्त करण्यात आली होती. या सा-यांचे पडसाद लातूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत उमटण्याची शक्यता होती. त्यामुळे लातुरात दाखल झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांना रवींद्र चव्हाणांनी निर्माण केलेल्या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न करावा लागला. लातूरमधील जाहीर सभेत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, विलासराव देशमुख यांचा महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा आहे. मला त्यांच्याविषयी नितांत आदर आहे. त्यांनी विलासराव देशमुख आणि गोपीनाथ मुंडे यांच्या मैत्रीचाही उल्लेख केला. लातूरची महती व्यक्त करताना ते म्हणाले, लातूर ही अशी भूमी आहे, जिने महाराष्ट्राला मोठे नेते दिले. शिवराज पाटील, विलासराव देशमुख आणि शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी महाराष्ट्रात जे काम केले त्यामुळे लातूरला वेगळी ओळख मिळाली.

माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख हे असे नाव आहे ज्याने पक्षाच्या पलीकडे जाऊन महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलला. म्हणून आपण त्यांचा नेहमीच आदर करतो, हे सांगताना माझ्या मनात कुठलाही संकोच नाही. आमच्या प्रदेशाध्यक्षांच्या वक्तव्यामुळे येथे दोन दिवसांपूर्वी गोंधळ झाला. राजकीयदृष्ट्या नवीन रेकॉर्ड तयार करण्याच्या अनुषंगाने त्यांना बोलायचे होते पण त्यांचे शब्द चुकीच्या पद्धतीने गेले, त्याबद्दल त्यांनी दिलगिरीही व्यक्त केली. मुख्यमंत्री पुढे म्हणाले, मी जाहीरपणे सांगतो, आमची लढाई काँग्रेस पक्षाशी असली तरी विलासराव देशमुखांबद्दल आम्हाला नितांत आदर आहे. म्हणजे देवाभाऊंना प्रदेशाध्यक्षांनी केलेली घाण स्वच्छ करण्याचे काम करावे लागले. त्यानंतर देवाभाऊंनी लातूरसाठी काय करणार आहोत याचा पाढा वाचला. लातूरमध्ये परत कधीही रेल्वेने पाणी आणावे लागू नये म्हणून २६२ कोटींची पाणीपुरवठा योजना मंजूर केली असून निवडणुकीनंतर दुस-या टप्प्याला मंजुरी देणार असल्याचे सांगितले. लातूरमध्ये ट्रॅफिकचा मोठा प्रश्न आहे, तो दूर करू, शिवराज पाटील चाकूरकर यांचा पुतळा उभारू असे आश्वासनही त्यांनी दिले. धनेगाव धरणापासून हरंगूळ जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत नवी मुख्य पाईपलाईन तसेच झोपडपट्टीवासीयांना नवी घरे देण्याचा संकल्पही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केला.

एकंदरीत देवाभाऊंचा लातूर दौरा सारवासारव करण्यासाठीच होता. युतीत मतभेदाची आग मुंबई महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील अंतर्गत मतभेद उफाळून आले आहेत. भाजप आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसमधील वाक्युद्ध अधिक तीव्र होत असताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचा निकाल अद्याप प्रलंबित असल्याची आठवण करून देत थेट अजित पवारांना इशारा दिला आहे. बावनकुळे म्हणाले, सत्तेत असताना वारंवार भाजपवर टीका करणे राजकीय शिस्तीस अनुरूप नाही. प्रलंबित घोटाळ्यांचे निकाल सार्वजनिक होणे हे प्राथमिकतेने करणे आवश्यक आहे. सत्तेत असूनही अजित पवारांनी भाजपवर सतत टीका केल्याने राजकीय वातावरण तापले असून, त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस आणि भाजपचे इतर नेतेही या परिस्थितीबाबत गंभीर आहेत. महायुतीत एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. वैयक्तिक राजकीय विधानांनी घटकांमध्ये गोंधळ निर्माण होत आहे असे भाजप नेत्यांचे म्हणणे आहे.

राजकीय वर्तुळात अशी चर्चा आहे की, महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या अंतर्गत तणावामुळे महायुतीच्या सत्ताधारी एकतेवर परिणाम होऊ शकतो. निवडणूक जसजशी जवळ येत आहे तसतशी आरोप-प्रत्यारोपांची तीव्रता वाढताना दिसत आहे. पुण्यातील पत्रकार परिषदेतून महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी भाजपच्या काही धोरणांवर आणि स्थानिक नेतृत्वावर टीका करत आरोपांचा सूर वाढवला. त्यांनी स्थानिक विकासकामांच्या श्रेयवादावर भर देत सांगितले की, सत्ताधारी पक्षाचे काही निर्णय लोकहितापेक्षा पक्षीय हितासाठी होत असल्याचे दिसून येते. अजित पवारांनी पत्रकार परिषदेत विशेषत: पुण्यातील महापालिका क्षेत्रातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि सामाजिक आरोग्य यासारख्या विकासकामांबाबत भाष्य केले. त्यांनी इशारा दिला की, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने केलेले दावे आणि प्रत्यक्ष कामकाज यात मोठा फरक दिसून येतो. लोकांचा विश्वास टिकवणे हेच खरे नेतृत्व आहे, ते फक्त वचन देऊन पूर्ण होत नाही. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांचे म्हणणे असे की, तुम्ही इतकी वर्षे पालकमंत्री होता, मग भरीव काम का झाले नाही? कोणी आम्हाला कामाबद्दल प्रश्न विचारत असेल तर त्यांनी आधी स्वत:ला आरशात पाहावे! बावनकुळे म्हणाले, जर मागील काळातील कागदपत्रे आणि प्रकरणांची चाळणी केली तर अजितदादांना बोलताही येणार नाही. ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याची सुनावणी अद्याप न्यायालयात सुरू आहे.

निकाल लागलेला नाही, केस विचाराधीन आहे. अजित दादा प्रगल्भ नेते आहेत, त्यांच्या अनुभवाचा सन्मान केला पाहिजे. एका छोट्या महापालिका निवडणुकीसाठी अशा जुन्या आणि प्रलंबित बाबी बाहेर काढून महायुतीत मनभेद निर्माण करणे योग्य नाही. खूप बोलता येईल, पण ही वेळ त्या चर्चेसाठी नाही. सध्या लक्ष केवळ आगामी निवडणूक आणि मतदारांशी थेट संवादावर असले पाहिजे. मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वाद आणि मतभेद तीव्र होत असताना भाजप नेते आशिष शेलार यांनीही महत्त्वपूर्ण विधान केले. ते म्हणाले, आम्ही सावरकरांचे भक्त आहोत आणि सावरकरी विचारांवर चालणारे लोक आहोत. त्यामुळे महायुतीतील सर्व भागधारकांनाही या विचारांची मान्यता असणे आवश्यक आहे. जर अजित पवारांचा पक्ष सावरकरांचे विचार मान्य करत असेल तर त्यांच्यासोबत सहकार्य करण्यास आम्ही तयार आहोत. त्यांना विचार मान्य नसतील तर त्यांच्याविना, त्यांच्या विरोधात जाण्यास आम्ही तयार आहोत. राजकारणात स्पष्ट भूमिकेचा आदर केला पाहिजे आणि लोकशाहीत कोणत्याही दबावाखाली वागणे योग्य नाही. आशिष शेलारांनी अजित पवारांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यानंतर 'भारत देश संविधानावर चालतो' असे उत्तर राष्ट्रवादीचे प्रवक्ते सूरज चव्हाण यांनी दिले.

# आठवणी जागवायच्या असतात!

राज्यात महापालिका निवडणूक प्रचाराने जोर धरला आहे. या निमित्ताने बडे बडे नेते आपलाच पक्ष सत्तेसाठी योग्य कसा हे मतदारांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न करत आहेत. काही जण आपल्या अकलेचे तारे तोडत आहेत. काही नेत्यांच्या आठवणी मनात ठसलेल्या असतात, त्या पुसता पुसल्या जात नाहीत. मग ते मन समर्थकाचे असो की विरोधकाचे. 'याद ना जाये, बीते दिनों की' हे त्रिवार सत्य आहे. लातूरचे सुपुत्र माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि लातूरकरांचे नाते अतूट होते, आहे आणि राहणारच! ते तोडण्याचा प्रयत्न करणारे स्वत: तुटतील पण लातूर आणि विलासराव देशमुख हे नाते अतूटच राहील.

लातूरचे शिवराज पाटील, विलासराव देशमुख आणि निलंग्याचे शिवाजीराव पाटील हे लातूरच्या, मराठवाड्याच्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणाचे लाल-बाल-पाल होते. या त्रिमूर्तींनी लातूरचे नाव राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर दिगंत केले. त्या असुयेमुळे पोटशूळ उठलेले काही अश्लाघ्य आत्मे लातूरच्या आठवणी पुसण्याच्या प्रयत्नात आहेत. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे त्यापैकीच एक! हे अश्लाघ्य आत्मे 'महात्म्या'चे नाव पुसण्याच्या प्रयत्नात आहेत. बालबुद्धीच्या रवींद्र चव्हाणांचा तरी काय दोष त्यांचे केंद्रीय नेतेच महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू यांचे नाव, आठवणी पुसण्याच्या 'महान' कार्यात मग्न आहेत. प्रत्येक राजकीय नेत्याला आपला पक्ष मजबूत करण्याचा, वाढवण्याचा हक्क आहे. परंतु त्याने बोलताना शब्द जपून वापरण्याचे तारतम्य ठेवायलाच हवे.

माजी केंद्रीय मंत्री शिवराज पाटील चाकूरकर नेहमी म्हणायचे की, बोलताना काय बोलायचे याऐवजी काय बोलायचे नाही ते लक्षात ठेवले पाहिजे. रवींद्र चव्हाणांची नेमकी येथेच चूक झाली. त्याचे झाले असे- भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी लातूर येथील एका मेळाव्यात लोकनेते आणि माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याबद्दल केलेल्या विधानामुळे मोठी खळबळ उडाली आणि येथील राजकीय वातावरण चांगलेच पेटले. भाजप कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून रवींद्र चव्हाणही चांगलेच पेटले आणि त्यांनी लातूर शहरातून विलासराव देशमुखांच्या आठवणी पुसल्या जातील असे विधान केले. या विधानानंतर काँग्रेस कार्यकर्ते आणि नेत्यांनी आक्रमक पवित्रा घेत भाजपचा निषेध केला. लातूर महापालिका निवडणुकीच्या तयारीसाठी भाजप कार्यकर्त्यांचा एक मोठा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला भाजपचे अनेक दिग्गज नेते उपस्थित होते. भाषणाला सुरुवात करताना कार्यकर्त्यांचा जोश पाहून रवींद्र चव्हाण म्हणाले, तुमचा हा उत्साह सांगतोय की, १०० टक्के विलासरावांच्या आठवणी या शहरातून नक्कीच पुसल्या जातील यात काही शंका नाही. यावेळी काही टाळ्याही वाजल्या, अर्थात तो पैसे देऊन आणलेल्या हातांचा नाद होता. या विधानामुळे लातूरच्या राजकीय वर्तुळात वादाला तोंड फुटले. मेळावा संपल्यानंतर चव्हाण यांनी माध्यमांशी बोलणे टाळले, त्यामुळे चर्चेला अधिक उधाण आले.

रवींद्र चव्हाण यांच्या विधानावर काँग्रेसने सोशल मीडियाच्या माध्यमातून आणि अधिकृत निवेदनातून जोरदार हल्लाबोल केला. काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत म्हणाले, विलासरावांच्या जाण्याला दशकभराहून अधिकचा कालावधी उलटल्यानंतरही त्यांच्या आठवणी नष्ट व्हाव्यात ही कामना भाजपच्या द्वेषाचे राजकारण दर्शवते. त्यांचे स्थान केवळ लातूरमध्येच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेच्या मनात आहे ते कधीही पुसले जाऊ शकत नाही. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आपला संताप व्यक्त करताना म्हणाले, विलासराव देशमुखांनी लातूरला राष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवून दिली आहे. त्यांचे लातूरशी असलेले नाते भाजपच्या नेत्यांना कधीच समजणार नाही. सत्तेचा माज असलेले हे नेते काहीही बरळत असून, लातूरकर या अपमानाचा करारा जवाब देतील. महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत विलासराव देशमुखांच्या वारशाचा विषय निघाल्याने हा वाद अधिक गडद होण्याची शक्यता आहे. लातूर म्हणजे विलासराव देशमुख असे समीकरण अनेक दशकांपासून आहे. आता भाजप या आठवणी पुसण्याचा दावा करत असल्याने भविष्यात भाजप विरुद्ध काँग्रेस असा थेट आणि टोकाचा संघर्ष पहायला मिळू शकतो.

चव्हाणांच्या वक्तव्याने केवळ एका नेत्याचा अपमान झालेला नसून तो लातूरच्या सांस्कृतिक परंपरेवर आणि लोकभावनेवरचा थेट आघात आहे. सामान्य माणसाशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यामुळे लातूरकरांच्या मनात विलासरावांना अढळ स्थान प्राप्त झाले आहे. त्यांचे नाव, आठवण कोणीही 'माईका लाल' पुसू शकत नाही. विलासरावांनी लातूरला शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा आणि आधुनिक विकासाची ओळख दिली. त्यांच्या कार्याची आठवण पुसून टाकणे म्हणजे त्यांच्याशी बेइमानी, कृतघ्नपणा करण्यासारखे आहे. लातूरकर ते कदापि करणार नाहीत. महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने बड्या नेत्यांना कोकिळकंठ फुटला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'लाडकी बहीण योजना' बंद होणार अशी आवई विरोधकांनी उठवली आहे. पण मी मुख्यमंत्री असेपर्यंत ही योजना बंद होणार नाही. आता केवळ लाडकी बहीणच नव्हे तर लखपती दीदी करण्यासाठी काम सुरू आहे. अघळपघळ बोलण्यासाठी प्रसिद्ध असलेले महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, महापालिका निवडणुकीत बिनविरोध निवड होणे वावगे नसून हा चांगला पायंडा आहे.

गंमत म्हणजे 'बिनविरोध'च्या विरोधात रान उठले आहे. बिनविरोध निवडीचा मुद्दा फक्त चर्चेचा राहिला नाही तर या निवडीला न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. संविधानाचे अभ्यासक, घटनातज्ज्ञ उल्हास बापट यांनी म्हटले आहे की, मी आयुष्यात इतक्या मोठ्या प्रमाणात बिनविरोध निवडणूक झालेली पाहिली नाही. हे वरवरचे लक्षण असून आतला रोग हा काही वेगळाच असल्याचा संशय मला येत आहे. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार उमेदवार एकच असेल तर मतदान घेतले जात नाही. मात्र, अलिकडच्या काळात सर्वोच्च न्यायालयाने बिनविरोध निवडणुकीतही मतदारांना आपली नापसंती व्यक्त करण्याची संधी (नोटा) असावी का, यावर विचार सुरू केला आहे. दरम्यान, विलासराव देशमुख यांच्यावरील वक्तव्याबाबत रवींद्र चव्हाण यांनी दिलगिरी व्यक्त केल्याचे वृत्त आहे. लेकिन 'जो बूंद से गई वो हौद से नही आती!'

# बंडोबांचे आव्हान!

महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मंगळवार (३० डिसेंबर) ही अंतिम तारीख असून सर्वच राजकीय पक्षांनी बंडखोरी टाळण्यासाठी लपवाछपवीचा मार्ग स्वीकारला आहे. कारण त्यांच्यासमोर बंडोबांचे आव्हान कायम आहे. विशेष म्हणजे ही बंडखोरी सर्वपक्षीय आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीतही तेच चित्र आहे. सोमवारी उमेदवारांची यादी जाहीर होऊ लागल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांत बंडखोरी उफाळून आली. त्यामुळे बंडखोरांची नाराजी दूर करण्याचे मोठे आव्हान राजकीय पक्षांसमोर उभे आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी सोमवारी दुपारनंतर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (श. प.), ठाकरे सेना व मनसे यांनी आपले काही उमेदवार जाहीर केले. मात्र यात काही निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलले गेल्याने सर्वच राजकीय पक्षांतील इच्छुकांनी नाराजीचा सूर आळवला. राष्ट्रवादी काँग्रेसचे (श. प.) मुंबईतील जे मोजके माजी नगरसेवक होते, त्यातील मुंबई अध्यक्ष राखी जाधव, बबन कनावजे, धनंजय पिसाळ, मनीषा रहाटे या चारही माजी नगरसेवकांनी पक्षाला सोडचिठ्ठी देऊन दुस-या पक्षात प्रवेश केला. राखी जाधव यांनी भाजपचे कमळ हाती घेतले आहे. राखी जाधव यांनी भाजपात प्रवेश केल्याने भाजपची घाटकोपरमध्ये ताकद वाढली आहे. राखी जाधव २०१२ व २०१७ च्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १३१ मधून निवडून आल्या होत्या. मनसे नेत्या स्नेहल जाधव, भाजप नेत्या अर्चना पाटील यांनी ठाकरे सेनेत प्रवेश केला. ठाकरे सेनेचे चंद्रकांत वायंगणकर यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांचे कार्यकर्ते नाराज झाले आहेत. ठाकरे गटात प्रभाग क्र. ९५ च्या उमेदवारीवरून आमदार अनिल परब आणि वरुण सरदेसाई यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. परब माजी नगरसेवक चंद्रकांत वायंगणकर यांच्यासाठी आग्रही होते,

तर सरदेसाई यांनी दिवंगत नेते श्रीकांत सरमळकर यांच्या जावयासाठी अर्ज मागितल्याने परब संतप्त झाले. अखेर परब यांनी माघार घेतल्याने शास्त्री यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. मात्र, या वेळी परब आणि सरनाईक यांच्यातील अंतर्गत मतभेद समोर आले. मुंबई महानगरपालिकेवर भगवा झेंडा फडकवण्यासाठी उमेदवारी जाहीर करताना भाजपने सावध भूमिका घेतली आहे. सोमवारी भाजपने ६६ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी सुरुवातीला २२७ पैकी दीडशेहून अधिक जागा लढण्याची भाजपची तयारी होती. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची कोंडी झाली होती. शिवसेनेने याबाबत नाराजी व्यक्त केल्यानंतर दोन्ही पक्षांत ८-१० दिवसांपासून बैठकांचे सत्र सुरू होते. अखेर भाजप आणि शिवसेनेत २०७ जागांवर एकमत झाले. भाजपच्या पहिल्या यादीत ठाकरेंच्या शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' करत नुकताच भाजपात प्रवेश केलेल्या तेजस्वी घोसाळकर यांना प्रभाग क्र. १ मधून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

तसेच भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांचे पुत्र नील सोमय्या यांना वॉर्ड क्र. १०७ मधून तिकिट देण्यात आले आहे. २०७ जागांपैकी १२८ जागा भाजप लढवणार आहे, तर शिवसेनेच्या वाट्याला ७९ जागा आल्या आहेत. अजून २० जागांवर दोन्ही पक्षांमध्ये तोडगा निघालेला नाही. मुख्यमंत्री फडणवीस यांचे निकटवर्तीय आणि भाजपचे माध्यम प्रमुख नवनाथ बन यांना मानखुर्द शिवाजीनगरच्या प्रभाग क्र. १३५ मधून उमेदवारी देण्यात आली आहे. युवा मोर्चा अध्यक्ष तेजिंदरसिंग यांना मुंबईतील वॉर्ड क्र. ४७ मधून उमेदवारी देण्यात आली आहे. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे सेनेने सोमवारी सायंकाळपर्यंत अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर न करताच निश्चित १२५ उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप केले. उमेदवार पळवापळवी टाळण्यासाठी ठाकरे सेनेने महायुतीला चकवा देत एबी फॉर्मचे गुपचूप वाटप केले. ठाकरे सेना १५० जागा लढवणार आहे म्हणे. मनसे ७० जागा लढवणार आहे. मुंबई महापालिकेसाठी काँग्रेसने सोमवारी ८७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली.

या यादीत खासदार चंद्रकांत हंडोरे यांची कन्या प्रज्योती हंडोरे यांना प्रभाग क्र. १४० मधून उमेदवारी देण्यात आली आहे. तसेच आमदार अस्लम शेख यांच्या मुलाला आणि बहिणीला उमेदवारी देण्यात आली आहे. नाशिक व छत्रपती संभाजीनगर महापालिका निवडणुकीत महायुतीत बिघाडी झाली असून महायुतीतील घटकपक्ष आपल्या सोयीनुसार युती करून निवडणुका लढवणार असल्याचे चित्र आहे. संभाजीनगरमध्ये भाजपसोबत युती करण्याच्या प्रयत्नांना प्रतिसाद मिळत नसल्याने शिवसेना शिंदे गटात अस्वस्थता आहे. पालकमंत्री संजय शिरसाट म्हणाले, भाजप सकारात्मक प्रतिसाद देत नसेल तर एकनाथ शिंदे युतीसाठी पर्यायी मार्ग काढतील. शिवसेनेने ४१ जागांचा प्रस्ताव दिला होता. सुमारे ८-९ बैठका झाल्या तरी त्यातून ठोस मार्ग निघाला नाही. नाशिक महानगरपालिकेसाठी महायुतीचा जागावाटपाचा तिढा न सुटल्याने महायुतीत फूट पडली असून शिंदे आणि अजित पवार गट एकत्र लढणार असल्याचे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते नरहरी झिरवळ यांनी जाहीर केले.

भाजपने घेतलेल्या निर्णयामुळे आम्हाला स्वतंत्र विचार करावा लागत आहे, असे ते म्हणाले. पुण्यात दोन राष्ट्रवादी एकत्रितरीत्या लढणार आहेत तर भाजप व शिवसेना शिंदे गटाची युती होण्याची शक्यता आहे. पुण्याच्या राजकारणात पक्षांतराचा जोरदार सामना सुरू आहे. काही दिवसांपूर्वी भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसला दिलेल्या धक्क्याची परतफेड अजित पवारांनी केली आहे. भाजपच्या काही माजी नगरसेवकांना आणि पदाधिका-यांना त्यांनी सोमवारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश दिला. भाजपचे माजी नगरसेवक शंकर पवार, किरण बारटक्के, धनंजय जाधव यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. ठाकरे गटाचे माजी नगरसेवक अशोक हरणावळ, भाजपचे संदीप ज-हाड, सुनीता गलांडे यांनीही हातात घड्याळ बांधले. भाजपने बंडखोरीची शक्यता लक्षात घेऊन सोमवारी यादी जाहीर न करता उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप केले. पक्षाने अशा प्रकारे थेट फॉर्म दिल्याने इच्छुकांचा चांगलाच गोंधळ उडाला. पत्ता कट झालेल्या माजी नगरसेवकांनी पक्षाच्या नेत्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला.

महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी जागावाटप व उमेदवार जाहीर करण्यास जाणीवपूर्वक उशीर केल्याचे दिसते. बंडखोरी टाळण्यासाठी हा युक्तिवाद केल्याचे सांगण्यात येत असले तरी त्यामागची कारणे अधिक खोलवर आहेत. एकाच जागेसाठी अनेक इच्छुक, ऐनवेळी आयात उमेदवारांना दिली जाणारी तिकिटे आणि वर्षानुवर्षे पक्षासाठी काम करणा-या निष्ठावंतांना डावलले जाणे यामुळे नाराजी वाढली. पूर्वीसारखी पक्षांतर्गत शिस्त आज कुठल्याच पक्षात दिसत नाही. कुंपणावर असलेले नेते संधिसाधूपणे पक्षांतर करून तिकिट मिळवतात आणि त्यासाठी विकास व समाजसेवेचे गोंडस लेबल लावले जाते. शेवटच्या क्षणापर्यंत इच्छुकांना 'कामाला लागा' असा संदेश देत प्रचार व खर्चाची जबाबदारी त्यांच्यावर टाकली जाते. निर्णय मात्र मोजक्यांच्या हातात राहतो. परिणामी बंडखोरी होते. नाराजी दडपली जाते, पण ती नष्ट होत नाही!

Printed, Published and Owner by ASHWINI SHRIKANT DAROLE on behalf of Marathi Weekly NIRBHID VARTMAAN, printed at Shree Samarth Printers, Appa Balwant Chowk, Near Prabhat Theatre, 535, Shaniwar Peth, Pune -411030 (Maharashtra) Publish at- 607, Faluni Bldg, Near Icici Bank, NDA Road Near, Uttam Nagar, Shivne, Pune City, Pune - 411023 (Maharashtra) Editor - ASHWINI SHRIKANT DAROLE Cont. No - 9637777003
PRGI NO:- MAHMAR/2023/90686, DECL NO:- SDM/SR/74/2023

मुद्रक, प्रकाशक आणि मालक सौ.अश्विनी श्रीकांत दारोळे, यांचे नावे मराठी साप्ताहिक निर्भीड वर्तमान, श्री समर्थ प्रिंटर्स, अप्पा बळवंत चौक, प्रभात थेअटरच्या शेजारी, ५३५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० (महाराष्ट्र). द्वारे मुद्रित करुन आणि प्रकाशन ठिकाण: ६०७, फाल्गुनी बिल्डींग, आयसीआयसीआय बँकेशेजारी, एनडीए रोड, उत्तम नगर, शिवणे, पुणे शहर, पुणे ४११०२३ महाराष्ट्र. संपादक : अश्विनी श्रीकांत दारोळे संपर्क - ९६३७७७७००३ (अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या लेख व जाहिरात यांचेशी मालक, संपादक सहमत असतीलच असे नाही सदरचे वाद विवाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत)
पीआरजीआई क्र. MAHMAR/2023/90686 डि.क्र:- SDM/SR/74/2023

# प्रशासकीय कामकाजात खासगी ई-मेलच्या वापराला चाप; जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे कडक निर्देश

**अहिल्यानगर:-** शासकीय कार्यालयांमध्ये होणाऱ्या पत्रव्यवहारात आता पारदर्शकता आणि सुरक्षितता अधिक बळकट होणार आहे. मानवाधिकार कार्यकर्ते दीपक पाचपुते यांनी केलेल्या मागणीची दखल घेत, जिल्हाधिकारी मा. दादासाहेब रघुनाथ गीते यांनी जिल्ह्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांना केवळ अधिकृत छ्खउ (छ्रींळेपरश्र खपषेीारींळली उशपीीश) ई-मेल आयडी वापरण्याचे सक्त आदेश दिले आहेत.



**खासगी ई-मेल वापरावर बंदी का?**

- **अनेक कार्यालयांमध्ये ऋारळश्र किंवा धरहे सारख्या खासगी ई-मेल आयडीवरून प्रशासकीय कामकाज केले जाते. जिल्हाधिकाऱ्यांनी पत्रात स्पष्ट केले आहे की, अशा प्रकारचा वापर:**
- **डेटा सुरक्षा आणि गोपनीयतेसाठी घातक ठरू शकतो.**
- **महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अंतर्गत नियमांचे उल्लंघन ठरतो.**
- **माहिती गळतीचा आणि भविष्यात अभिलेख नष्ट होण्याचा धोका निर्माण करतो.**
- **माहिती अधिकारांतर्गत अधिकृत माहिती मिळवण्यात अडचणी निर्माण होतात.**

**कठोर कारवाईचा इशारा**

जिल्हाधिकारी कार्यालयाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार, आता सर्व पंचायत समित्या, ग्रामपंचायती आणि शासकीय कार्यालयांना कार्यालयीन आदेश, अहवाल आणि पत्रव्यवहारासाठी केवळ पळल.ळप किंवा सीं.ळप या डोमेन असलेल्या ई-मेलचाच वापर करावा लागणार आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंग कारवाई, विभागीय चौकशी आणि सेवा नियमांनुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्टपणे बजावले आहे.

**अंमलबजावणीची जबाबदारी निश्चित**

या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी खालील अधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली आहे:

- **संबंधित विभागप्रमुख**
- **गटविकास अधिकारी**
- **पंचायत समिती अधिकारी**
- **ग्रामपंचायत स्तरावरील संबंधित अधिकारी**

**पारदर्शकतेच्या दिशेने मोठे पाऊल**

या निर्णयाचे स्वागत करताना दीपक पाचपुते म्हणाले की, शासकीय ई-मेलच्या सक्तीमुळे प्रशासनात पारदर्शकता येईल. यामुळे अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित होईल आणि सर्वसामान्यांचा माहिती अधिकार अधिक मजबूत होईल.

## रिपब्लिकन संघर्ष सेनेचा अहिल्यानगर जिल्ह्यात विस्तार; राहुल सोनकांबळे यांच्याकडे नेतृत्वाची धुरा

**अहिल्यानगर:** रिपब्लिकन संघर्ष सेनेचे संघटन अधिक बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी आयु. राहुल सोनकांबळे यांची अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आयु. शशिकांतजी कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली.



नियुक्ती सोहळा आणि मान्यवरांची उपस्थिती पुणे येथे पार पडलेल्या एका विशेष बैठकीत राहुल सोनकांबळे यांना नियुक्ती पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी संघटनेतील वरिष्ठ नेतृत्वाची प्रमुख उपस्थिती होती:

आयु. शशिकांत कांबळे (संस्थापक अध्यक्ष)

आयु. श्रीकांत दारोळे (राष्ट्रीय महासचिव)

आयु. सुभाष सर्जेराव (महाराष्ट्र उपाध्यक्ष)

आयु. अंकुश सोनवणे (महाराष्ट्र संघटक सचिव)

आयु. फिरोज शेख (पुणे जिल्हाध्यक्ष)

१२ वर्षांचा प्रदीर्घ सामाजिक अनुभव नवनियुक्त जिल्हाध्यक्ष राहुल सोनकांबळे हे गेल्या १२ वर्षांपासून नगर जिल्ह्याच्या सक्रिय राजकारणात आणि समाजकारणात कार्यरत आहेत. एक खंबीर लोकनेता म्हणून त्यांची ओळख असून, विशेषतः गोरगरीब आणि अन्यायग्रस्त लोकांसाठी ते नेहमीच तत्पर असतात. त्यांच्या या निस्पृह सेवेची दखल घेऊनच संघटनेने त्यांच्यावर ही मोठी जबाबदारी सोपवली आहे.

नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण राहुल सोनकांबळे यांच्या नियुक्तीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील दलित, शोषित आणि वंचित घटकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी आणि रिपब्लिकन संघर्ष सेनेची विचारधारा घराघरात पोहोचवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन यावेळी राहुल सोनकांबळे यांनी केले.

राहुल सोनकांबळे यांच्यासारखा तळागाळातील कार्यकर्ता जिल्हाध्यक्ष झाल्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात संघटनेला नवी ऊर्जा मिळेल. जनसामान्यांचे लढे आता अधिक तीव्र होतील.- आयु. श्रीकांत दारोळे, राष्ट्रीय महासचिव, रिपब्लिकन संघर्ष सेना

## औरंगाबादमध्ये वंचितच्या प्रचार रिक्षेवर भ्याड हल्ला

- **सुजात आंबेडकरांचे पोस्टर फाडून चालकाला मारहाण**

**छत्रपती संभाजीनगर:-** आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. वंचित बहुजन आघाडीला मिळणारा वाढता जनाधार पाहून विरोधकांमध्ये अस्वस्थता पसरली असून, यातूनच आता हिंसक घटना घडू लागल्या आहेत. प्रभाग क्रमांक ५ मधील परिसरात वंचित बहुजन आघाडीच्या प्रचार रिक्षेवर काही समाजकंटकांनी भ्याड हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

नेमकी घटना काय?

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, प्रभाग क्रमांक ५ मध्ये वंचित बहुजन आघाडीच्या अधिकृत उमेदवार वर्षा रतन जाधव आणि श्याम भारसाकले यांच्या प्रचारासाठी एक रिक्षा परिसरात फिरत होती. यावेळी काही अज्ञात समाजकंटकांनी ही रिक्षा अडवली. रिक्षेवर लावण्यात आलेले युवा नेते सुजात आंबेडकर यांचा फोटो असलेले बॅनर फाडून टाकण्यात आले. केवळ बॅनर फाडून हे समाजकंटक थांबले नाहीत, तर त्यांनी रिक्षाचालकाला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत बेदम मारहाण केली. या हल्ल्यात रिक्षेचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

विरोधकांचे धाबे दणाणले: वंचितची टीका

वंचित बहुजन आघाडीच्या स्थानिक नेत्यांनी या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. महानगरपालिका निवडणुकीत वंचितला मिळणारा अभूतपूर्व प्रतिसाद पाहून विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. लोकशाहीच्या मार्गाने लढा देण्याची ताकद नसल्यामुळे आता विरोधक गुंडगिरीचा आधार घेत आहेत, अशी टीका पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

**घटनेचे गांभीर्य आणि मागणी**

या हल्ल्यानंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

प्रशासनाला इशारा: अशा भ्याड हल्ल्यांमुळे आमचा प्रचार थांबणार नाही, उलट जनताच आता मतदानातून या गुंडगिरीला चोख उत्तर देईल, असा विश्वास पक्षाने व्यक्त केला आहे.

पोलिस तक्रार: या प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून, निवडणुकीच्या काळात कायदा व सुव्यवस्था बिघडवणाऱ्या समाजकंटकांना तातडीने अटक करण्याची मागणी केली जात आहे.

**निवडणुकीत तणाव वाढला**

या घटनेमुळे शहरातील राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत थेट उमेदवारांच्या प्रचार साहित्यावर आणि कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले लोकशाहीसाठी घातक असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत. आता पोलीस या प्रकरणात काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## राज्यस्तरीय 'संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा २०२५-२६'चे आयोजन; १ लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक

**मुंबई:** राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा २०२५-२६ या विशेष राज्यस्तरीय उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोगाच्या वतीने हा उपक्रम राबविला जात असून, विद्यार्थ्यांमध्ये घटनात्मक मूल्ये, मूलभूत अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव निर्माण करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

**'घर घर संविधान' संकल्पना**

घर घर संविधान या संकल्पनेतून ही जनजागृती चळवळ राज्यातील प्रत्येक घरापर्यंत आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार करण्यात आला आहे. युवकांनी संविधान समजून घेऊन एक जबाबदार, सजग आणि लोकशाही मूल्यांवर आधारित नागरिक म्हणून घडावे, यासाठी हा उपक्रम मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी व्यक्त केला आहे.

**उपक्रमाची वैशिष्ट्ये आणि पात्रता**

- **पात्रता: राज्यातील इयत्ता ८ वी ते पदव्युत्तर (झ्ळ) शिक्षण घेणारे सर्व विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.**
- **प्रशिक्षण: सहभागी विद्यार्थ्यांसाठी १२ जानेवारी २०२६ पासून १५ दिवसांचे ऑनलाइन प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल.**
- **मार्गदर्शन: महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूर येथील तज्ज्ञ प्राध्यापक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.**
- **भाषा: ही स्पर्धा मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा तीन भाषांमध्ये उपलब्ध असेल.**
- **परीक्षा पद्धती: प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर 'प्रॉक्टरिंग' तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाइन परीक्षा घेतली जाईल.**

आकर्षक पारितोषिके आणि प्रमाणपत्रे

**स्पर्धेतील विजेत्यांसाठी भरघोस बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत:**

- **प्रथम पुरस्कार: १,००,००० (१ लाख रुपये)**
- **द्वितीय पुरस्कार: ५१,०००**
- **तृतीय पुरस्कार: ११,०००**

याव्यतिरिक्त, यशस्वी विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके दिली जातील. विशेष म्हणजे, सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या वतीने सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

**नोंदणी कशी करावी?**

इच्छुक विद्यार्थ्यांनी १० जानेवारी २०२६ पर्यंत आपली नोंदणी पूर्ण करणे आवश्यक आहे.

✼ नोंदणी शुल्क: केवळ ९९ रुपये.

✼ अधिकृत संकेतस्थळ: www.yuvacareer.com

महत्त्वाची सूचना: विद्यार्थ्यांनी कोणत्याही अनधिकृत किंवा बनावट संकेतस्थळाला बळी न पडता केवळ अधिकृत वेबसाइटवरूनच नोंदणी करावी, असे आवाहन 'बार्टी'मार्फत प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

**संयुक्त सहकार्य**

हा उपक्रम आदिवासी विकास विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी (नागपूर), बार्टी (पुणे) आणि युवा करिअर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे.







# ८८९ पीडित कुटुंबांच्या संघर्षाला यश; जातीय अत्याचारांतील खून प्रकरणांत वारसांना मिळणार शासकीय नोकरी, शासन निर्णय निर्गमित

**मुंबई:** राज्यातील जातीय अत्याचारांच्या घटनांमध्ये ज्या कुटुंबांनी आपला आधार गमावला, अशा ८८९ खून प्रकरणांतील पीडित वारसांना शासकीय नोकरी देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचा ऐतिहासिक शासन निर्णय (ऋठ) अखेर जाहीर झाला आहे. नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टिसचे राज्य सचिव वैभव गिते यांनी दिलेल्या प्रदीर्घ न्यायालयीन आणि वैधानिक लढ्यानंतर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

पाच मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा आणि सातत्यपूर्ण लढा

हा लढा केवळ रस्त्यावरचा नव्हता, तर तो मंत्रालयातील दालनांपासून ते न्यायालयापर्यंत पसरलेला होता. वैभव गिते यांनी या मागणीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून राज्यातील पाच मुख्यमंत्र्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. यामध्ये:

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण

देवेंद्र फडणवीस

उद्धव ठाकरे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

या सर्व नेत्यांच्या भेटी घेऊन पीडित कुटुंबांच्या अश्रूंना न्याय देण्याची मागणी करण्यात आली होती. अनेक वेळा या मागणीकडे प्रशासकीय स्तरावर दुर्लक्ष झाले, मात्र गिते यांनी आपली जिद्द आणि चिकाटी सोडली नाही.

प्रशासकीय पातळीवरील पाठपुरावा

केवळ राजकीय नेत्यांकडेच नव्हे, तर मंत्रालयातील वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांकडेही याचा सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. प्रधान सचिव दिनेश वाघमारे, श्याम तागडे, सुमंत भांगे, विजय वाघमारे आणि हर्षदीप कांबळे यांच्याकडे वारंवार बैठका घेऊन तांत्रिक अडचणी दूर करण्यात आल्या. अखेर, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे यांच्या स्वाक्षरीने हा शासन निर्णय निर्गमित झाला आहे.

उध्वस्त कुटुंबीयांना उभं केल्याचं समाधान - वैभव गिते

या यशाबद्दल बोलताना वैभव गिते भावूक झाले. ते म्हणाले, जातीय अत्याचारांमध्ये उध्वस्त झालेल्या कुटुंबांच्या वेदना आणि त्यांच्या डोळ्यांतील अश्रू मी जवळून पाहिले आहेत. त्यांच्या आयुष्यातील अंधार दूर करण्यासाठी हा लढा दिला होता. आज या ८८९ कुटुंबांच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा झाला असून, त्यांना सन्मानाने जगण्यासाठी शासकीय नोकरी मिळणार आहे. उध्वस्त झालेली ही कुटुंबे पुन्हा उभी राहिली, याचे मोठे समाधान आहे.

काय आहे शासन निर्णयाचे महत्त्व?

या निर्णयामुळे राज्यातील ८८९ पीडित कुटुंबांतील एका पात्र वारसाला शासकीय नोकरीत सामावून घेतले जाणार आहे. यामुळे केवळ आर्थिक आधारच मिळणार नाही, तर सामाजिक न्यायाच्या दृष्टीने हे एक मोठे पाऊल मानले जात आहे. वैभव गिते यांच्या या प्रामाणिक आणि खडतर लढ्याचे राज्यभरातून स्वागत होत आहे.



## पुणे पोलिसांची मोठी कारवाई: 'बचकया' टोळीतील सराईत गुन्हेगार 'चौपाटी राजा' गजाआड; दरोड्याची पूर्वतयारी उधळली

**पुणे:** आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरात गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. दरोडा घालण्याच्या पूर्वतयारीत असलेल्या आणि जबरी चोरीच्या अनेक गुन्ह्यांमध्ये फरार असलेल्या 'बचकया' टोळीतील सराईत आरोपीला गुन्हे शाखा युनिट-६ ने मोठ्या शिताफीने अटक केली आहे. या कारवाईमुळे शहरातील गुन्हेगारी विश्वात खळबळ माजली आहे.

### आरोपीची ओळख आणि पार्श्वभूमी

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव राजेश उर्फ चौपाटीया बबलू मंगल मंडळ (वय २९ वर्ष, रा. पठारे वस्ती, लोणी काळभोर, मूळ रा. बिहार) असे आहे. आरोपी हा गुन्हेगारी जगतात 'चौपाटी राजा' या नावाने कुप्रसिद्ध असून तो खतरनाक 'बचकया' टोळीशी संबंधित आहे. विशेष म्हणजे, हा आरोपी सध्या मोक्का (चउजउ-) कायद्यांतर्गत दाखल असलेल्या गुन्ह्यात जामिनावर बाहेर होता.

### कशी झाली अटक?

दिनांक ११/१२/२०२५ रोजी गुन्हे शाखा युनिट ६ चे पथक आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने हद्दपार आणि पाहिजे असलेल्या आरोपींचा शोध घेत होते. यावेळी पोलीस अंमलदार नितीन मुढे यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, बंडगार्डन पोलीस ठाण्यातील विविध गुन्ह्यांत हवा असलेला राजेश उर्फ चौपाटी राजा हा 'अंगुर वाईन' परिसरात थांबला आहे. माहिती मिळताच पोलिसांनी परिसरात सापळा रचला आणि त्याला ताब्यात घेतले.

### गुन्ह्यांची मोठी यादी

तपासामध्ये आरोपीवर बंडगार्डन, लष्कर आणि विश्रामबाग पोलीस स्टेशनमध्ये २०१३ पासून ते २०२५ पर्यंत अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याचे समोर आले आहे. यामध्ये प्रामुख्याने:

- **दरोडा आणि खुनाचा प्रयत्न**
- **जबरी चोरी आणि मोबाईल चोरी**
- **गंभीर दुखापत करणे आणि शस्त्रास्त्र कायदा**
- **मारहाण आणि धमकी देणे**

### पोलीस पथकाची कामगिरी

ही यशस्वी कामगिरी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. पंकज देशमुख, पोलीस उपआयुक्त श्री. निखिल पिंगळे, आणि सहा. पोलीस आयुक्त श्री. राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये पोलीस निरीक्षक वाहीद पठाण, सपोनि मदन कांबळे आणि युनिट ६ च्या पोलीस अंमलदारांनी मोलाची भूमिका बजावली.

पुणे पोलिसांनी आरोपीला पुढील कायदेशीर कारवाईसाठी बंडगार्डन पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले आहे. निवडणुकांच्या तोंडावर अशा सराईत गुन्हेगाराला अटक केल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

## बंदुकीच्या जोरावर दहशत आणि लोकशाहीची हत्या; स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर सुप्रिया सुळे संतप्त

**मुंबई:** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सध्या जे काही प्रकार घडत आहेत, त्यावरून खासदार सुप्रिया सुळे यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. तब्बल ७-८ वर्षांनंतर निवडणुका होत असतानाही मतदारांचा हक्क हिरावला जात असून, राज्यात लोकशाहीची थट्टा सुरू आहे, अशा शब्दांत सुळे यांनी आपली अस्वस्थता बोलून दाखवली आहे.

### 'बिनविरोध' निवडणुकांचा संशयास्पद पॅटर्न

राज्यात अनेक ठिकाणी निवडणुका बिनविरोध होत असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. यावर भाष्य करताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, निवडणुकीत 'नोटा' चा पर्याय उपलब्ध असतानाही मोठ्या प्रमाणावर निवडणुका बिनविरोध



"बंदुकीच्या जोरावर दहशत आणि लोकशाहीची हत्या";
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर संतप्त प्रतिक्रिया

होणे हे लोकशाहीसाठी सुदृढ लक्षण नाही. मतदारांना आपला प्रतिनिधी निवडण्याचा जो अधिकार संविधानाने दिला आहे, तो हिरावून घेतला जात असल्याचे चित्र दिसत आहे.

### धमक्या, ब्लॅकमेलिंग आणि पैशांचा पाऊस

निवडणूक प्रक्रियेत सुरू असलेल्या गैरप्रकारांचा पाढा वाचताना सुप्रिया सुळे यांनी गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या मते, निवडणुकीत खालील विघातक गोष्टींचा वापर होत आहे:

- **दहशतवाद: उमेदवारांना बंदुकीच्या जोरावर धमकावणे आणि दहशतीचे वातावरण निर्माण करणे.**
- **दबाव तंत्र: उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी उमेदवारांवर विविध प्रकारे दबाव टाकणे आणि त्यांचे ब्लॅकमेलिंग करणे.**
- **प्रलोभने: मतदारांना पैशांचे आमिष दाखवून आणि अतोनात संपत्तीचा वापर करून लोकशाही विकत घेण्याचा प्रयत्न करणे.**
- **बोगस मतदान: अनेक ठिकाणी बोगस मतदानाचे प्रकार घडत असून त्यामुळे पारदर्शकतेला तडा जात आहे.**

### निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

हे सर्व गंभीर प्रकार माध्यमांतून सातत्याने समोर येत असतानाही निवडणूक आयोग गप्प का? असा सवाल सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला आहे. निवडणूक आयोगाचे या सर्व प्रकारांकडे होणारे दुर्लक्ष अधिक चिंताजनक आहे. जर निवडणूक यंत्रणाच मूकदर्शक बनली, तर लोकशाहीचे रक्षण कोण करणार? असा रोकडा सवाल त्यांनी केला.

### संसदेत आवाज उठवणार

सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केले की, त्यांनी यापूर्वीही संसदेत या मुद्द्यावर आवाज उठवला आहे आणि भविष्यातही लोकशाहीच्या संरक्षणासाठी हा संघर्ष सुरूच राहील. राज्यातील जनतेच्या मनातील अस्वस्थता आपण मांडत असल्याचे सांगत त्यांनी प्रशासनाने आणि आयोगाने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

## हनी ट्रॅपचा सापळा: मुलीच्या साहाय्याने बोलावले कात्रजला; खेड शिवापूरच्या जंगलात केला अमनचा अंत

**पुणे:-** टिंगरेनगर येथील १७ वर्षीय अमनसिंग सुरेंद्रसिंह गच्वड याच्या अपहरण आणि हत्येचा गुंता सोडवण्यात पुणे पोलिसांना यश आले आहे. जुन्या भांडणाचा बदला घेण्यासाठी एका मुलीचा वापर करून 'हनी ट्रॅप' रचला गेला आणि अमनची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी दोन मुख्य आरोपींसह दोन अल्पवयीन मुलांना बेळगाव (कर्नाटक) येथून बेड्या ठोकल्या आहेत.

### नेमकं काय घडलं?

अमन २९ डिसेंबर २०२५ रोजी घरातून गाडी घेऊन बाहेर पडला होता, मात्र तो पुन्हा घरी परतला नाही. ३१ डिसेंबर रोजी विश्रांतवाडी पोलिसांत याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली. तांत्रिक तपासात अमनचे शेवटचे लोकेशन आणि मोबाईल कॉल्स तपासले असता पोलिसांना धक्कादायक माहिती मिळाली.

### सापळा कसा रचला?

तपासातून निष्पन्न झाले की, आरोपी नागेश धबाले याच्या मैत्रिणीने इन्स्टाग्रामवर अमनशी मैत्री केली होती. तिने त्याला प्रेमाच्या जाळ्यात ओढून भेटण्यासाठी कात्रज येथे बोलावले. तिथून ती त्याला खेड शिवापूरच्या चतुर्भुज मंदिरात दर्शनासाठी घेऊन गेली. मंदिरातून दर्शन घेऊन बाहेर पडताच दबा धरून बसलेल्या आरोपींनी मुलीच्या इशाऱ्यावर अमनला पकडले.

### जंगलात नेऊन हत्या:

आरोपींनी अमनला तिथून जवळच असलेल्या जंगलात दोन-तीन किलोमीटर आत नेले. जुन्या भांडणाच्या रागातून त्यांनी अमनचा तिथेच निघृण खून केला. गुन्ह्यानंतर आरोपी पसार झाले होते.

### पोलिसांची मोठी कारवाई:

गुन्हे शाखा युनिट ३ आणि विश्रांतवाडी पोलिसांनी कौशल्याने तपास करत आरोपी बेळगावात असल्याचे शोधून काढले. तिथे धाड टाकून १) प्रथमेश चिंधू आढळ (वय १९) आणि २) नागेश बालाजी धबाले (वय १९) यांसह दोन विधीसंघर्षित बालकांना ताब्यात घेतले.

ही यशस्वी कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या घटनेने पुण्यात सोशल मीडियाच्या माध्यमातून होणाऱ्या गुन्हेगारीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.